लोकमत

# पुणे महानगरपालिका

## जाहीर प्रकटन

पुणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण /अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागासाठी खालील अस्थायी पदावर सहा महिन्यांकरिता करार पद्धतीने एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचा हुद्दा | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | एकूण पदांची संख्या | गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | सहायक अतिक्रमण निरीक्षक | रुपये १७,०८०/- | १. माध्यमिक शालान्त परीक्षा (एस. एस. सी.) उत्तीर्ण किंवा समकक्ष अर्हता. २. शासनाकडील सर्वेअर कोर्स अगर सब ओव्हरसीयर कोर्स अथवा तत्सम कोर्स उत्तीर्ण. ३. अनुभव सर्वेअर कामाचा ०५ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य. | ४५ | अजा ६<br>अज ३<br>विआज १<br>भजब १<br>भजक २<br>भजड १<br>विमाप्र १<br>इमाव ९<br>सा.आणि शैक्ष. मागास वर्ग-७<br>आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक-४<br>खुला १० |

**वरील अस्थायी पदांकरिता खालील अटी व शर्ती राहतील.**

१. वरील दरमहा एकवट वेतनावर करार पद्धतीने नेमणुका करणेसाठी उमेदवारांचे त्यांचे प्राप्त अर्जामधील शैक्षणिक पात्रता कामाचा अनुभव व इतर पात्रता यांचे आधारे परीक्षण करून त्यानुसार गुणानुक्रमे निवड व प्रतीक्षा यादी तयार करून ६ महिने कालावधीसाठी केल्या जातील.

२. वयोमर्यादा खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहीर प्रकटनाच्या दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. उमेदवाराकडे वर केलेली नमूद शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक आहे. तसेच सदर पदासाठी सादर केलेल्या अर्जासोबत एस. एस. सी., एच.एच.सी. व इतर सर्व्हेअर आय. टी. आय. उत्तीर्ण अंतिम गुणपत्रिका, प्रमाणपत्रे, जात प्रमाणपत्र व अधिवास प्रमाणपत्र तसेच अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित सत्यप्रतींचा एक संच, स्वतःचा एक पासफोटो आकाराचा फोटो सहित सादर करणे आवश्यक आहे. वरीलपैकी कोणतेही कागदपत्रे अपूर्ण असल्यास आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

४. महिला उमेदवार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

५. वरील पदांसाठी मा. उप-आयुक्त (अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग) पुणे महानगरपालिका, पुणे यांचे नावे अर्ज करून तो खालील कार्यालयामध्ये जाहीर प्रकटन प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत कार्यालयीन दिवशी (शासकीय सुट्ट्या सोडून) व कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत. (दि. १९/०७/२०१९ ते दि. २६/०७/२०१९ अखेर)

६. वरील पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांचे कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. उप आयुक्त, अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका यांना राहील.

७. वरील नेमणुका या करार पद्धतीने ६ महिने मुदतीकरिता करण्यात येतील. तदनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्याकरिता पुन्हा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८. (उमेदवार महाराष्ट्र राज्यातील असावा.)

९. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१०. निवड प्रक्रियेचे अंतिम अधिकार मा. उप-आयुक्त, अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

११. निवड झालेल्या उमेदवारास स्वखर्चाने करारनामा करून घ्यावा लागेल.

१२. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एका महिन्याचे एकवट वेतनाइतकी अनामत रक्कम म्हणून मनपा ट्रेझरीमध्ये भरावी लागेल. त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१३. सदर नियुक्त्या एकवट वेतनावर करार पद्धतीने होणार असल्याने उमेदवारांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी हक्क सांगता येणार नाही. तसेच मनपा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

१४. गुणांकन तक्त्याप्रमाणे "objective assessment" नुसार नेमणुका करण्यात येतील.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :** अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग, पुणे महानगरपालिका भवन, खोली क्र. ११९, पहिला मजला, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ येथे सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ वा. पर्यंत वरील अटी व शर्तीमधील अ.क्र. ५ मध्ये नमूद केल्यानुसार कार्यालयीन दिवशी सादर करावा. अर्जदार यांनी अर्जात त्यांचे नाव, पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, लिंग, वय, जात, शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव व संपर्क क्र. इत्यादी सर्व बाबी स्पष्टपणे नमूद करून अट क्र. ३ मध्ये नमूद गुणपत्रिका व शैक्षणिक व अनुभवाचे प्रमाणपत्रासहित सादर कराव्यात.

सही/-

**(माधव जगताप)**

उप-आयुक्त

अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग

पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र १/२५१ दि. १७/०७/२०१९

**आपत्ती व्यवस्थापन कक्ष संपर्क क्रमांक (०२०) २५५०१००० व (०२०) २५५०६८००/१, २, ३, ४**

**मनपा सुरक्षा विभाग - २५५०११३०/मनपा अग्निशमन दल - २६४५१७०७/२६४५०६०१/१०१**

**मनपा घरपाडी विभाग - २५५०१३९२ / मनपा पथ विभाग - २५५०१०८३ (खड्डे दुरुस्तीकरिता)**

**अंगणात पाणी शिंपडणे, वाहने धुणे, सद्यस्थितीत पाण्याचा गैरवापर टाळा.**